

। आगर टाकळी । रामदास स्वामी मठात व्याख्यानमालेच्या समारोपप्रसंगी व्याख्यान देताना ऋतुजा वाळिंबे. समवेत देवस्थानचे विश्वस्त सुधीर शिरवाडकर, प्रकाश पवार, ज्योतिराव खैरनार, अध्यक्ष एन.के. ब्रह्मे

# हनुमान जयंती व्याख्यानमालेचा आगर टाकळीत समारोप

। नाशिक ।

आगर टाकळी येथील मारुती देवस्थान आणि रामदास स्वामी मठात दि. १५ एप्रिल श्रीरामनवमी ते २२ एप्रिल श्री हनुमान जयंती निमित्त आठदिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात होती.

समर्थ रामदास स्वामींनी स्वहस्ते स्थापन केलेल्या रामदास स्वामी मठात गोमय हनुमनाच्या मूर्तीला निरनिराळे अलंकार, फुलहार यांनी सजविण्यात आले. सकाळी श्री हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. हनुमान जन्मानंतर पाळणा म्हणण्यात आला. भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम झाला.

श्रीरामनवमीपासून सुरू झालेल्या या व्याख्यानमालेचा काल समारोप करण्यात आला.

यावेळी ऋतुजा वाळिंबे यांनी हनुमान चरित्र कथन केले. रामायणातील सुंदरकांडाचा आधार घेत त्यांनी हनुमान चरित्राचे वर्णन केले. त्या म्हणाल्या की, हनुमान म्हणजे विजयाची देवता. हनुमानाने आपले सर्व जीवन रामसेवेत अर्पण केले. शौर्य, दक्षता, अखंड सावधानता, बलवान, धैर्यवान, अत्यंत बुद्धिवान, पराक्रमी प्रभावी व्यक्तिमत्त्व हे सर्व गुण हनुमानात आहेत. संकटसमयी धैर्य कसे बाळगावे याची शिकवण श्री हनुमानाने दिली. त्यामुळे सर्व ठिकाणी जागोजागी हनुमानाची स्थापना केली. या ठिकाणी स्वतः समर्थांनी स्वहस्ते गोमय मारुतीची स्थापना केल्याने या स्थानाचे विशेष स्थान माहात्म्य आहे, असे त्या म्हणाल्या.

याप्रसंगी देवस्थानचे विश्वस्त सुधीर शिरवाडकर, प्रकाश पवार, ज्योतिराव खैरनार, अध्यक्ष एन.के. ब्रह्मे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विनायक गोविलकर, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ यांची विशेष उपस्थिती लाभली. दुपारी ४.०० ते ६.०० स्वराली जोगळेकर, ऋतुजा नाशिककर, वैदेही नाशिककर यांचा भक्तिगीतांचाही कार्यक्रम झाला. सूत्रसंचालन अॅड. भानुदास शौचे यांनी केले.